# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. २ जून, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

-----------------------------------------------------

## एस.वाय.बी.एस्सी.-सीबीसीएस सत्र ४ च्या दि.१५ ते २८ जून कालावधीतील परीक्षा दुपारी १.३० ऐवजी सकाळी ९.०० वा सुरु होतील.

जळगाव दि.२ ( ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एस.वाय.बी.एस्सी.-सीबीसीएस अभ्यासक्रमाच्या सत्र ४ च्या दि.१५ ते २८ जून या कालावधीतील परीक्षेच्या वेळेत बदल करण्यात येत असून या परीक्षा दुपारी १.३० ते ३.०० ऐवजी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळत होणार आहेत.

विद्यापीठाने यापूर्वी प्रसिध्द केलेल्या परीक्षा वेळापत्रकात, एस.वाय.बी.एस्सी.-सीबीसीएस अभ्यासक्रमाच्या सत्र ४ च्या, दि.१५ जून ते २८ जून २०२१ या कालावधीतील (विषय कोड८ अंकाने सुरु होणाऱ्या) विषयांची परीक्षेची वेळ दुपारी १.३० ते ३.०० अशी देण्यात आली होती. मात्र काही विद्यार्थ्यांच्या सत्र ३ व ४ चे विषयांची परीक्षा एकाच वेळेत येत असल्याने एस.वाय.बी.एस्सी.-सीबीसीएस अभ्यासक्रमाच्या सत्र ४ च्या दि.१५ ते २८ जून या कालावधीतील विषयांच्या परीक्षेच्या वेळेत बदल आवश्यक होते. त्यामुळे या कालावधीतील विषयांची परीक्षेची वेळ सकाळी ९.०० ते १०.३० अशी करण्यात आली आहे. सदर आशयाचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर www.nmu.ac.in वर प्रसिध्द करण्यात आले असून परीक्षा समन्वयकांनी व महाविद्यालयांनी सदर वेळेतील बदल विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा. तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी सदर परीक्षा वेळेत बदलाची नोंद घ्यावी व संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या सुधारित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी अशी माहिती विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन संचालक श्री.बी.पी.पाटील यांनी दिली.

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करिता